श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

अंक ५ वर्ष ९] श्रावण [शके १८५४

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव-तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तखड.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| " उदी द्या आणि वाड्यांत जाऊन बसा. " | ... | १-३ |
| चमत्कार | ... ... ... ... | ४-५ |
| श्रीगुरुपौर्णिमा आणि दोन पत्रें | ... ... ... | ६-१० |
| आधुनिक शास्त्रप्रवीणांना प्रश्न ३ रा | ... ... | ११-१४ |
| काय करावें ? | ... ... ... ... | १५-२२ |
| श्री संतकथामृत ( अध्याय २-३-४ ) | ... ... | १३-२२ |


---

## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंगी " टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २-८-०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

---

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनी ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध करण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,

—प्रकाशक.

## " उदी घ्या आणि वाड्यांत जाऊन बसा. "

हे श्रीसाईमाउलीच्या तोंडचे गोड शब्द हजारों भक्तांनीं ऐकलेले आहेत आणि लेखकासारख्या मूढमतिनें, वाडा म्हणजे उताऱ्याचीच जागा मानून तेथें जाऊन, यथेच्छ खाऊन पिऊन, स्वस्थ होऊन, ताणून झोंप घेऊन, अथवा इतरांबरोबर वायफळ गप्पा झोडून कालक्षेप करावा, असेंच बहुधा होत असे.

आपण कुणाच्या चरणांजवळ बसलों ! त्या दिव्य पुरुषाची योग्यता किती मोठी ! याची आम्हाला किंचित् तरी जाणीव व्हावी ! शिव शिव ! !

एके वेळीं श्रींच्या चरणांजवळ बसलों असतां श्रीसाईबाबा लेखकाच्या बायकोला म्हणाले, " आये ! आपण एक चांगला वाडा बांधू, त्यांत तूं वर राहशील आणि मी खालीं राहीन बरं ! आपल्या वाड्यांत छान छान ( तळ हात दाखवून ) अश्शीं अश्शीं सुंदर गुलाबाचीं फुलं येतील बरं ! "

हे शब्द ऐकून तिला आनंद झाला आणि वाटलें कीं श्रींच्या कृपेनें आपणाला आतां एक स्वतःच्या ऐहिक मालकीची सुंदर हवेली, फुलबागेसहित राहावयास जरूर मिळेल !

लेखकाला आपल्या आर्थिक स्थितीची जाणीव चांगलीच होती. त्यानें त्याच्या तरुणपणीं आपल्या वृद्ध वडिलांसाठीं एक सुंदर भव्य वाडा बांधला होता, ज्याची पुढें कांहीं कारणांनी [illegible] झाल्यामुळें त्याचें मन या बाब- तींत साफ उडून गेलें होतें. या व इतर गोष्टींमुळें लोकेषणा व वित्तेषणा यांचा त्याला मनस्वी तिटकारा आला होता.

या सर्व कारणामुळें, श्रीसाईबाबांचे वरील शब्द ऐकून त्याच्या विचा रांना गति मिळाली. बाबा म्हणतात तो वाडा, दगड, माती, धोंडे, चुना, रेती, विटा यांचा [illegible] ढासळून पडणारा, असा नाशिवंत वाडा तर खास नव्हे; परंतु तो अनंत चिरायु, आनंददायक, व स्फूर्तियुक्त असाच असला

पाहिजे; कां तर त्यांत श्रीसाईबाबांची वस्ति होऊन सुंदर सुंदर गुलाबांची अत्यंत सुवासिक, तळहाताइतकीं मोठमोठालीं फुलें यावयाचीं !!

विचाराअंतीं हा वाडा म्हणजे आपलें मन. त्यांत श्रीसाईबाबांची भक्तिभावनेनें स्थापना केल्यावर सुंदर सुंदर सुवासिक विचाररूपि फुलें निर्माण व्हावयाचींच अशी त्याची ठाम समजूत झाली.

या वाडयासंबधानें श्रींच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडून येईल असा आपल्या भाविक स्त्रीची त्यानें समजूत केली.

" आये ! तुझ्या संसाराची चिंता मला, " या श्रींच्या आश्वासनावर या उभयतांनीं दिवस काढले आहेत. कांहींही होवो, **" देह जावो अथवा राहो; तुझ्या चरणीं आमुचा ठावो, "** या श्रीतुकाराम महाराजांच्या उक्तिप्रमाणें भरंवसा ठेवावा लागत आहे.

कारण मागें लढाई चालू असतां तिनें श्रींना त्यासंबधानें प्रश्न विचारल्यावरून बाबा बोलले होते, " आये ! ही लढाई आतां लवकरच संपेल ! पण लोक लई खराब झाले आहेत ! पुढें लई वाईट दिस येणार आहेत ! लोकं गल्लोगल्लीं नागवीं फिरतील ! एकमेकांना फाडफाडून खातील ! तेव्हां देवाची सर्वांना आठवण होईल ! आणि त्याला करुणा येऊन पुढें चांगले दिवस तो दाखवील ! "

हें भाकित श्रींनीं लगबग १८ वर्षांमागें लेखकापुढें केलें होतें; त्याप्रमाणें साक्षात् परिस्थिति सध्यां दिसत नाहीं काय ? श्रींचे शब्द कालत्रयीं वृथा होतील काय ?

म्हणून वाडयासंबधानें श्रींनीं उच्चारलेले शब्द प्रत्येक स्त्रीपुरुषाला संबोधून आहेत, आणि आपल्या स्वतःच्या मनरूपि मनोहर वाडयांत प्रत्येकानें श्रींना कसें वसवून त्यांना कसें प्रेमानें आळवावें, हालवावें, हें ज्याच्यात्याच्या उत्कट भावनेवर सर्वस्वी अवलंबून आहे.

लेखकासारख्या अभाविक मूढमतीला मात्र हें कांहींही करतां येण्यासारखें नसल्यामुळें, श्रींची अमोलिक उदी मात्र प्रसंगोपात् आपल्या भृकुटींत लावण्याखेरीज दुसरें साधन त्याला ठाऊक नाहीं; काय करावें !

असो ! आतां श्रीसोहिरोबा आंबियेकर यांच्या एका उत्कृष्ट कवनाचा उतारा देऊन हा लेख संपवितों.

" हरिस्मरण विस्मरण जरि तरीं काय जिणें रे असोन ॥ ध्रु० ॥
" शरीर फिरवो तुजला मिरवी देव असे रे रुसोन ॥
" जवळी असोन, **तव हृदयीं वसोन,** भगवंत नये वा दिसोन ॥१॥
" आळशी कामा उगा रिकामा थट्टाचि करिशी बसोन ॥
" कुकर्माच्या कांहीं वर्माच्या गोष्टी सांगशीं किसून ॥ २ ॥
" म्हणे सोहिरा, आदि गुरू हा, माझे हृदयीं रिघून ॥
" जनांसीं उद्धरावया कारणें वचन सांगतों कसून ॥ ३ ॥

श्रीसद्गुरु साईबाबांनीं कळकळीनें आम्हाला बोधामृत पाजावें, अत्यंत अद्भुत दाखले दाखवावे, तरी आमचें अळवावरच्या पाण्यासारखेंच वर्तन ! !

**" म्हातारा "**

## दुरुस्ती

| | |
|---|---|
| **अंक ज्येष्ठाचा** | पान २२ श्री. लक्ष्मण गोविंद मुंगी यांच्या नावं श्रीरामनवमीच्या उत्सवासाठीं रु. २ जमेस दिले आहेत ते रुपया १ असें समजावें. |
| **अंक आषाढाचा** | पान २१ रुपये ५४१–२–९ चुकीचा आहे. रुपये ४४१–२–९ बरोबर आहे. आढावा पाहावा. |

**रा. आ. तर्खड,**

आ. खजिनदार, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.

# चमत्कार

मित्र श्री. बाबासाहेब यांस नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांचा कृ. सा. न. वि. वि. सुमारें १८७७ सालापर्यंत मी आजोळी मिळालेल्या शिक्षणामुळें पक्का कर्मठ होतों. पुढें एका महाविद्वान नास्तिक गुरूंच्या दीर्घकालिक उपदेशामुळें सहज पक्का नास्तिक बनलों. आणि नंतर १८९० पासून श्रीतुकाराम, श्रीरामदास, श्रीएकनाथ, श्रीज्ञानेश्वर इत्यादि संतांच्या ग्रंथांचें मननपूर्वक वाचन होऊन धीप्रमाणें जरी आस्तिक्यबुद्धि उत्पन्न झाली, तरी प्रथमचा कर्ममार्ग कायमचा सुटून त्यांच्या पुढच्या द्विविधा निष्ठेंतील भक्ति-मार्गाचा लाभ झाला. परंतु चिकित्साबुद्धि मात्र कमी न होतां उलट बळावली. ती इतकी कीं, कै. वा. परममित्र साधुवर्य अण्णासाहेब पटवर्धन एकदां मला म्हणाले कीं, " अहो ! प्रत्यक्ष, चतुर्भुज पीतांबरधारी महाविष्णु जरी तुम्हाला भेटला, तरी 'तूं देव कशावरून हें आधीं सिद्ध कर,' असें तुम्ही त्यालाही म्हणणार !"

अशा स्थितींत प्रथमतः शिरडीस सन १९१० अखेर श्रीबाबांनीं मित्रांच्या बलात्कारानें मला खेंचून नेल्यावर, त्यांच्या अतीन्द्रिय ज्ञानानें थक्क करून सोडणारे जे अनेक चमत्कार पाहिले, त्यांतील एक असा आहे कीं, परममित्र कै. वा. हरि सीताराम उर्फ भाऊसाहेब दीक्षीत हे ऐके दिवशीं माध्यान्ह आरतीचे वेळीं बाबांची चरणसेवा करीत असतां त्यांच्या मनांत एक दुर्विचार आल्याबरोबर श्रींनीं त्यांना दूर व्हावयास सांगितलें, आणि नंतर त्यांनीं आपल्या मानसिक दुर्बलतेबद्दल पश्चात्तापपूर्वक मनांत क्षमा मागून लागळीच पुन्हा सेवेस आरंभ केला तेव्हां तिचा श्रींनीं आनंदानें स्वीकार केला.[१]

अशा अगणित साक्षात्कारांना मिथ्याभास म्हणण्यांत शहाणपण नाहीं.

---

१ अशा प्रकारचे अनुभव अनेकांना आले आहेत.

श्री. नीलकंठरावांनी ही स्वतःची लिहिलेली हकीकत प्रसिद्ध करण्यात लेखकाला स्वाभाविक रीत्या आनंद वाटत आहे. शिरडीस सन १९१० च्या डिसेंबर महिन्यांत लेखक गेला असतां त्याला सताऊन बेजार करणारे मागें वर्णन केलेले गुलामी साधु ते हेच गृहस्थ आणि त्यानंतर त्यांनी केलेली कै. नूलकरांची सेवा व श्रीसाईबाबांकडे त्यांची अप्रतिम भक्ति हें त्यांचें विहंगम न्यायाप्रमाणें झालेलें उड्डाण पाहून लेखकाला अत्यानंद झाला आहे. आतां तर श्री. नीलकंठरावांना श्रीपरमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंका घेणाऱ्या कोणाही नास्तिक्याचें समाधान कसें करूं, याविषयींची त्यांची अहेतुक निःस्वार्थी चळवळ पाहून कौतुक वाटतें. श्रीसाईमाउली त्यांना स्वानंद-सुखाचा लाभ दीर्घकालपर्यंत घेऊं देऊन त्यांच्यामुळें इतरांना तरी स्वल्पसा तो मिळावा अशी दृढ वासना असणारा सेवक

रा. आ. तर्खड,

संपादक,

श्रीसाईलीला.

# श्रीगुरुपौर्णिमा आणि दोन पत्रें

पत्र पहिलें:

वांद्रें, ता. १६ जुलै १९३२

रा. रा. सुंदरराव दिनानाथ नवलकर,

आ. सेक्रेटरी, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,

पो. शिरडी, via धोंड आणि राहातें.

कृ. शि. सा. न. वि. वि. प्रकृतिच्या अस्वस्थतेमुळे यंदाच्या श्रीगुरु-पौर्णिमेच्या उत्सवासाठीं हजर होतां आलें नाहीं, यासाठीं श्रींच्या चरणीं सेवकाची दिलगिरी निवेदन व्हावी.

× × × ×

सर्व मित्रमंडळीस सप्रेम नमस्कार. श्रीसाईमाऊलीकडे वरीलप्रमाणें तक्रार.

आपला सेवक,

बाबा.

पत्र दुसरें:

वांद्रें, ता. १८ जुलै १९३२

रा. सा. बाळार व देव,

पो. शिरडी.

कृ. सा. न. वि. वि. या सद्गुरुंच्या पौर्णिमेला मला हजर राहतां आलें नाहीं याबद्दल मनाला फारच रुखरुख लागली होती; परंतु श्रींची लीला कांहीं अगाध आहे, आणि दोन स्वप्नें पडलीं तीं अशीं:--

मला सहसा स्वप्नें पडत नाहींत आणि पडलीं तर तीं फारच विरळा पडतात.

१ लें स्वप्न:— श्रीव्यासपूजेचा दिवस ता. १७ जुलै १९३२, वेळ पहांटे सुमारें पांच वाजतां.

मी एका भयंकर अरण्यांतून चाललों आहें. वाटेंत एक गोळकळीस आलों, मुंबईकडचें घर दिसलें. आवाज आला कीं, “ या रानांत नाग वगैरे अनेक हिंस्र प्राणी आहेत, तर तूं या घरांत जाऊन थेट अगदीं वरची गच्ची आहे तेथें जा. घरांत भुताटकीचा प्रकार आहे, विचार कर !!”

घराचें दार उघडें होतें. जिना चढून पहिल्या मजल्यावर आलों. कांहीं चमत्कारिक भयप्रद आवाज आले. दरवाजांतून आंत नजर टाकतांच घरांत मनस्वी धूळ व कोळिष्टकें दिसलीं; वस्ती नव्हती. अत्यंत ओसाड व भयानक वाटलें. घाबरलों. श्रीसाईबाबांची आठवण केली, आणि त्यांचें नांव मोठ्यानें घेत घेत दुसऱ्या मजल्यावर आलों. सहज नजर फेंकली ! खालच्या मजल्याप्रमाणेंच प्रकार दिसला, पण भीति कमी झाली. बाबांच्या नांवाचा घोष चालू ठेवला. तिसऱ्या मजल्याकडे नजर न टाकतां सावकाश चवथ्या मजल्याच्या पायऱ्या चढून गच्चीवर आलों. तेथें एक सुरेख लांकडी बैठक दिसली. तिच्याजवळ श्री. दास गणूंच्या सारखे उभे राहणारे एक गृहस्थ दिसले. ते म्हणाले, “ बाबासाहेब ! तुम्ही आलांत, आतां तुमची परीक्षा घेऊं. या शिंगांतून फुंका पाहूं ?” तें शिंग त्वचित्र तोटीचें होतें, जसें सध्या कांहीं मोटरींना सर्पाकृति शिंग असतें त्याप्रमाणें. पण त्याच्या तोडांत एक डोळ्यासारखा पदार्थ होता. शिंग फुंकण्याचा यत्न करतां तो पदार्थ फक्त बुडबुड शब्द करूं लागला. मग हिंम्मत केली. सर्व बळ एकवट करून जोरानें फुंक मारली. त्याबरोबर “ **साईनाथ महाराज की जय !** ” असा जो निनाद निघाला तो सर्व आकाशांत भरून गुंजत राहिला, व अद्यापिही माझ्या या नाशिवंत कर्णेंद्रियांत घुमत आहे असें वाटलें. जागा झालों, पाहातों तों मी वांद्र्यांत. वाईट वाटलें !

असो ! आपण शिरडीस जाऊं शकलों नाहीं म्हणून सबंध दिवस मनाला खंत वाटत होती.

रात्रीं सुमारें ९-३०-१० वाजतां झोंपा गेली, तेव्हां तावडतोब **दुसरें स्वप्न** पडलें तें असें:—

श्रीशिरडीस गेलों आहें. आनंदानें श्रीद्वारकामाईतल्या धुनीचें प्रेमपूर्वक पूजन केलें व श्रीधुनीमाईला श्रीसाईबाबांनीं स्वतः उठून धुनींतून आपल्या हातून दिलेल्या उदीपैकीं थोडी उदी अर्पण करून ( जेणें करून ही धुनी प्रज्वलित राहील तोंपर्यंत श्रींच्याच हातची उदी सर्वांस मिळावी हा संकल्प ) तेथून श्रींच्या समाधीचें दर्शन व पूजन केलें. बरें वाटलें ! इतक्यांत तेथें माझ्या हाताखालचे गृहस्थ श्री. लालदास ( हे वैष्णव आहेत) व शेठचे मुनीम श्री. चंपकलाल ( हे आर्य समाजिस्ट आहेत ) ते दोघे तेथें ( शिरडीस समाधीजवळ ) मला भेटले, व म्हणाले, " बाबासाहेब ! हें तुम्हीं असें काय केलेंत ? चेकवर सह्या न करतां येथें आलेत ? आज सोमवार आहे; चेकांची जरूर पडेलच पडेल ! " मनांत चर्र् झालें ! श्रींची आठवण केली ! तेव्हां ते दोघे म्हणाले, " बाबासाहेब ! या मोटरमध्यें बसून कोठें न थांबतां एकदम ऑफिसमध्यें जा ! आतां ८ वाजले आहेत, दीड वाजतां ऑफिसमध्यें पोंहचाल ! " त्याप्रमाणें त्या मोटरमध्यें बसून बॅलर्ड पियरवर ऑफिसांत आलों व घड्याळांत पाहिलें तर बरोबर १–३० वाजला होता ! !

याप्रमाणें श्रीव्यासपौर्णिमेच्या दिवशीं श्रीसद्गुरुमाउलीनें आपली लीला या गरीब हृदयाला दाखविली.

ही हकीकत श्रींच्या समाधीपाशीं आपल्या सर्व मित्रमंडळीला वाचून दाखवावी. स्वतःची असल्यामुळें श्रीसाईलीलेंत छापवत नाहीं.

---

१ हें पत्र सोमवार ता. १८ जुलै रोजीं मुंबईत टपालांत पडले, आणि बुधवार ता. २० रोजीं दोन प्रहरीं शिरडीस दाखल झालें.

श्री. बाळासाहेब वगैरे मित्रमंडळी त्याच दिवशीं सकाळीं शिरडीहून निघाली असल्यामुळें त्यांना त्याच दिवशीं हें पत्र मिळालें नाहीं.

मित्रमंडळीच्या आग्रहावरून हीं पत्रें प्रसिद्ध होत आहेत.

सर्व परिचित व अपरिचित श्रीसाईमाउलीच्या बालगोपाळांना सेवकाचे नम्र प्रणाम.

श्री. सुंदरराव यांना लिहिल्याप्रमाणें आतां श्रीचरणीं तक्रारीस कारण राहात नाहीं म्हणून श्रींच्या चरणीं क्षमेची विनंति.

आपला नम्र,

बाबा.

ता. क.–सोबत पाठविलेली उदी आपणांस व मित्रमंडळींस योग्य वाटल्यास श्रीधुनीमाउलीला यथाशास्त्र अर्पण व्हावी ही विनंती.

आपला,

बाबा.

कृतानेक शि. सा. न. वि. वि. आपलें पत्र आज येथें मिळालें. त्यामुळें आपल्या मनोदयाप्रमाणें आपली कामगिरी–गोड–पुण्य–कामगिरी श्रींचे समाधिजवळ बजावतां आली नाहीं. आपलें पत्र वाचून अत्यानंद वाटला, व अंतःकरण भरून आलें. आपण या वेळीं श्रीक्षेत्र शैलधीस (शिरडी) न आल्यामुळें आम्हां सर्वांस चुकल्या चुकल्यासारखें झालें. आपण आतां येथ. मग याल असें वाटत होतें, पण श्रीबापुराव दीक्षीत आल्यावर मात्र पूर्ण निराशा झाली. ही निराश जर झाली नसती तर स्वप्नें कशीं पडतात व तीं भविष्यकथन कशीं करतात याचा श्रींनीं आपल्यास दिलेल्या अनुभवामृताचा आस्वाद आम्हांस घेतां आला नसता. माझ्या मतें आम्हीं शिरडीस आकून श्रीगुरुपौर्णिमेच्या दिवशीं शरिरानें जे व्यापार केले व जीं दर्शनें घेतलीं ते व्यापार व तींच दर्शनें आपल्यास बसल्या ठिकाणींच श्रीगुरुमाउलींनीं स्वप्नावस्थेंत शरीरानें शिरडीस आपली येण्याची अडचण व मनाची तळमळ लक्षांत घेऊन, मनाकरवीं करून दिलीं. ह्या स्वप्नावरून आपल्या अडचणींचा परिहार झाला असावा असें दिसतें. आपण विकट परिस्थितींत असतांना

असून आपल्यास फाडून खाणाऱ्या व्यक्तींनीं युक्त स्वजातिशून्य अशा भयंकर अरण्यांतून आपल्यास मार्ग काढावयाचा होता. श्रींनीं आपल्यास नामरूपी घर व नामगर्जनारूपी शिंग देऊन तें फुंकण्यास सांगून म्हणजे फक्त बाबांचें नामस्मरण करण्यास सांगून आलेल्या संकटाचा परिहार करून शिरडीस न गेल्यामुळें मनाची होणारी तळमळ दूर करून श्रीगुरुपौर्णिमा घरच्या घरींच साजरी केली. काय ही अगाध लीला!!! असो. आपण हीं आपलीं दोन्ही स्वप्नें व तीं पडण्यापूर्वीची आपल्या शरीराची शिरडीस जाण्याची असमर्थता व मानसिक तळमळ हीं अवश्य श्रीसाईलीलेंत येत्या अंकीं प्रसिद्ध करावीं. ही चमत्कृतिलीला अत्यंत बोधप्रद आहे.

श्रीबाबांच्या हातची उदी श्रीधुनीमाईस अर्पण करण्यांत फार मोठें तत्त्व भरलें आहे, असें मला वाटतें. पार्थिवाची पूजा पार्थिव वस्तूंनींच करावयाची, सागराची पूजा त्याच्याच पाण्यानें त्यास अर्घ्य देऊन करावयाची, सूर्याची पूजा दीप ओंवाळून करावयाची, त्याचप्रमाणें धुनीमाईची पूजा तिचीच उदी तिला अर्पण करून करावयाची. परंतु ती उदी मात्र बाबांच्याच हातची पाहिजे. संतस्पर्शानें जर गंगामाई पवित्र होते तर बाबांच्या हातच्या उदीस्पर्शानें धुनीमाई कां पवित्र होणार नाहीं? किती तरी बाबांच्या हातच्या उदीचा अधिकार हा!

५१ स्टेशन रोड, ठाणें,<br>ता. २३–७–३२.

आपला नम्र,<br>**बाळकृष्ण देव.**

# आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रवीणांचा प्रश्न ३ रा.

मानवगर्भातील हृदय त्याच्या पांचव्या महिन्याच्या अवस्थेत चलन पावतें याबद्दल पुढें सुचलेले विचार:—

त्या शरीरांतर्गत उत्पन्न होणारा त्याचा अश्वत्थवृक्ष ( मेंदु व त्यापासून उत्पन्न होणारें ज्ञान व चेतनातंतु ) हे भाग हळू हळू बनत असतात, आणि त्यांचें पोषण व वृद्धि त्या हृदयाच्या चालनेवर त्यावेळेनंतर सर्वथैव अवलंबून असतें.

यामुळें हृदय हें **प्राणाचें** मुख्य स्थान आहे असें जें योगशास्त्रांत अनुभवसिद्ध वर्णन केलें आहे त्याला सांप्रतच्या पाश्चात्य शास्त्रशिक्षणांचा पूर्ण पाठींबा मिळतो.

कोणत्याही प्राण्याच्या शरीरांतल्या हृदयाचें चलन बंद पडलें कीं, त्या शरीराला मृत्यूनें घेरलें असें साधारणतः समजावयास हरकत नाहीं. हृदय बंद झाल्यामुळें रुधिराभिसरण न होऊन शरीराच्या प्रत्येक भागाला शुद्ध रक्त न मिळून तो भाग निस्तेज होत जातो.

म्हणून मनुष्य मेल्यावर डॉक्टर प्रथम नाडी तपासतो. नळी छातीस लावून पाहतो, पापणी उघडून बोटानें डोळ्याच्या बुब्बुळाला स्पर्श करतो. ती जागा इतकी नाजुक आहे कीं, साधारण बेशुद्ध स्थितींतदेखील तिला स्पर्श सहन होत नाहीं. असें जरी असलें तरी सर्व शरीराला एकंदरीनें मृत्यु आलेला नसतो !

विजेचा धक्का बसून अथवा पाण्यांत बुडून नुकतेंच मृत मनुष्याचें हृदय जरी बंद झालें असतें तरी Artificial respiration ( कृत्रिम श्वासोच्छ्वास ) केला असतां व त्याच वेळीं हृदयाच्या जागेवर धक्कारे मारले असतां, तें हृदय पुन्हां चालू होऊन त्या शरीरांत प्राण पुन्हां आलेला दिसतो

त्या वेळीं त्या मनुष्यास " तूं कोठें होतास ? काय करीत होतास ? " असें विचारतां " मला गाढ झोंप लागली होती, " असें तो बोलतो.

सबब त्याचा प्राण त्याच्या शरीराला सोडून गेलेला नसतो. त्यामुळें केवळ श्वासोच्छ्वास बंद झाला, अथवा हृदयाचा व्यापार बंद पडला असें पाहून तो मनुष्य मृत झाला आहे असें समजून उतावळीनें त्याचें ताबडतोब दहन करणें अथवा त्याला मूठमाती देणें हें अत्यंत गैर आहे. **कांहीं तासांची अवधि जरूर दिलीच पाहिजे.** योग्याला भूमिगत करण्यापूर्वी त्याच्या टाळूवर जोरानें आघात करितात, याचें कारण हेंच. इतकेंच नाहीं तर मनुष्याचें मृत शरीर दहन करतांना त्याचा कपाळमोक्ष होईपर्यंत त्याचा प्राण त्याचें शरीर सोडून गेला नाहीं असें समजतात.

शरीरसंगोपनासाठीं हृदय ही त्या प्राण्याची अत्यंत अमोलिक वस्तु आहे. हें हृदय एका क्षणाचा विसावा न घेतां मनुष्याच्या गर्भाच्या पांचव्या महिन्यापासून तों त्याच्या देहांतापर्यंत रात्रंदिवस काम करीत असतें. या लहानग्या वस्तूंत काय प्रचंड शक्ति सांठवलेली आहे याचा आपण अतिपरिचयामुळें मुळींच विचार करीत नाहीं.

प्राणीशास्त्राचें अध्ययन करणारा विद्यार्थी बेडकांच्या पायांतल्या बोटांमध्यें असणाऱ्या पातळ पडद्यांतून चाललेला रुधिरप्रवाह सूक्ष्मदर्शक यंत्रानें जेव्हां पाहतो तेव्हां त्याला सानंदाश्चर्य वाटतें. हा देखावा प्रत्येकानें जरूर एकदां तरी आपल्या डॉक्टरस्नेह्याकरवीं पाहावा अशी लेखकाची खास नम्र विनंति आहे. हें पाहण्यासाठीं तो बेडुक मारावा लागत नाहीं, हेंही लक्षांत ठेवावें.

याचप्रमाणें Tradescantia Discolor (ट्राडेस्कान्शिया डिसकलर) या नांवाच्या एका घायपातासारख्या पण लहान व अत्यंत सुंदर रंगाच्या झाडाच्या सफेत फुलांच्या परागांच्या देठांत चाललेला प्रवाह सूक्ष्मदर्शक यंत्राच्या

---

१. यावरून प्रश्न उद्भवतो कीं, मृत्युपूर्वीच्या भयंकर वेदना संपल्यावर, मृत्यु ही प्रत्यक्ष स्थिति झोंपी जाण्याप्रमाणें आनंददायक असावी. —संपादक.

सहाय्यानें दिसतो, हा देखावादेखील जरूर पाहावाच पाहावा. त्यामुळें झाडांचें संगोपन कसें होत असतें तें स्पष्ट दिसतें.

बेडकाला मारून त्याचें हृदय त्याच्या शरीरावेगळें करून एका रकाबींत ठेऊन त्याच्यावर एक कांचेची हंडी उपडी ठेवून साधारण उबदार जागेंत ठेवलें असतां, तें स्वतंत्र हृदय, आंत रक्ताचा एकही थेंब नसलेलें साधारण चोवीस तासपर्यंत शरीरांत काम करीत असल्याप्रमाणेंच पिळे देत असतें. हा एक अत्यंत आश्चर्यकारक देखावा आहे.

याविषयीं विद्यार्थ्याला प्रश्न करावा, "हें कसें काय, निराधार असून चालत आहे तें?" तो ठराविक उत्तर देईल "Oh! It is owing to its nervous centre." ("त्याच्यांत असलेल्या मध्यवर्ति चालनातंतूमुळें") "अरे, तूं म्हणतोस तीच तर **प्राणाची चावी ना?** प्रत्युत्तर कसलें?" कारण सूक्ष्म विचार करण्याची हौस असेल तर!!!

बरें, इतक्यानें न थांबता, त्या मृत बेडकाच्या शरीरांतलीं सर्व आंतडीं बाहेर काढून, एक Voltaic Battery (रसायनयुक्त हलका विद्युत् प्रवाह उत्पन्न करणारी बॅटरी.) घेऊन, अथवा सध्यां आपणांपाशीं जे (Electric torches) म्हणजे खिशांत ठेवण्याचे अथवा हातांत धरण्याचे विजेचे कंदील असतात; त्यांतील एक लहानशी बॅटरी घेऊन, तिच्या दोन्ही पत्र्यांना दोन विजेच्या दिव्यांच्या तारा लावून, त्यांचें एक टोंक त्या मारलेल्या बेडकाच्या मानेच्या मणक्यांत ठेवावें, आणि दुसऱ्या तारेचें टोंक त्या बेडकाच्या पायाच्या नखांजवळ लावतांच तें मृत शरीर जिवंत असल्याप्रमाणें झटका देऊन दोन्ही पाय झाडतें. हा प्रयोग वारंवार केल्यानें त्या शरीरांतली शक्ति नष्ट होते. हा प्रयोग स्पष्ट दाखवितो कीं जरी शरीर मृत झालेलें दिसतें तरी त्याच्या अंतर्यात असलेली चेतना सर्वस्वीं नष्ट झाली नसते. अशी जर परिस्थिति आहे तर मग तुकाराममहाराज म्हणतात त्याप्रमाणें

१ शरीर मृत झालें असतांही दाढीमिशीचे केंस वाढत असतात. —संपादक.

**अशक्य तें काय तुम्हा नारायणा, निर्जिवा चेतना आणावया।**

या संतवाक्याचा सर्वांनीं सूक्ष्म विचार करावा. संत कोणत्या स्थितिप्रत गेले असतात? जगन्माता त्यांची कशी झाली असते? अथवा Cosmic Energy (कास्मिक एनर्जी) म्हणजे जगज्जननीचें त्यांना अनुभवयुक्त पूर्ण ज्ञान कसें झालें असतें, याविषयीं विचार करून संतांच्या या केवळ भाकडकथा नाहींत, यांत कांहीं तरी तथ्य आहे, यांचा सूक्ष्म विचार प्रत्येक आधुनिक विद्वान व विदुषींनीं जरूर करावा.

श्रीसाइमाउलीनें मेलेलें बकरीचें पोर उठविलेलें आम्ही सर्वांनीं पाहिलें, ही अतिशयोक्ति मुळींच नाहीं; आणि याच प्रकारच्या श्रीसाईमाउलीनें वेळोवेळीं दाखविलेल्या तिच्याच **गोड कला** नाहींत काय?

"मी महालक्ष्मी आहें! मी खोटें बोलत नसतों" हे शब्द त्यांनीं कृतींत उतरवून दाखविले नाहींत काय?

"म्हातारा"

# काय करावें ?

"अहो म्हातारे बुवा, तुम्ही आम्हाला काय करावयाला सांगतां तरी ? आम्हाला या संसारांत सर्व बाजूंनीं त्रास होत आहे, तर बायकामुलें, आईबाप, भाऊबंद, मित्रमैत्रिणी, नोकरचाकर, घरदार वगैरे सोडून देऊन रानावनांत जाऊन 'हरि हरि' करीत बसावें काय ? या निवृत्तिमार्गाच्या शिकवणीनें आमच्या देशाचें अगणित नुकसान झालें आहे. आम्ही कर्तव्यशून्य होऊन काय करावें ? पुढें कसें ? या विचारांनीं हताश व निःसत्त्व झालों आहोंत. जर वरील प्रकारचा तुमचा उपदेश असेल तर तो तुमच्याजवळच ठेवा ! तुमच्या समजुतीप्रमाणें आम्ही पापी असलों तरी चालेल, पण वायफळ बडबड आम्हाला नको !".

हाच विचार सर्वत्र दिसून येतो, आणि तो पाश्चात्य शिकवणीच्या फोलपणामुळेंच आहे.

"पहिल्यानें शब्द उत्पन्न झाला. त्यानंतर देवानें ही सृष्टि पांच दिवसांत बनविली. सहाव्या दिवशीं मनुष्य निर्माण केला व सातव्या दिवशीं देवानें विसावा घेतला."

खिस्त्यांच्या बायबलांतील या वाक्यांचा खोलें अर्थ[1] न समजल्यानें आणि प्रचलित आधिभौतिक शास्त्रांच्या शिकवणीमुळें, पाश्चात्य देशांत सृष्टोत्पत्तीचा वर दर्शविलेला दाखला मूर्खत्वाचा आहे, असें साहजिक वाटून त्यामुळें देव वगैरे सर्व झूट गोष्ट आहे, खावें, प्यावें, मजा करावी. सर्व सृष्टि आमच्या मालकीची आहे, आमच्या उपभोगासाठीं आहे. उत्क्रांतितत्त्वाच्या विचारांनीं तर त्यांच्या पुस्तकी धर्मभावनेला साफ झुगारून दिलें. या सर्व कारणांनीं निवृत्तिरूप विचार त्यांना त्याज्य वाटून सर्व प्रकारच्या प्रवृत्तिपर विचारांचाच पगडा सर्वांच्या ठिकाणीं दिसून येतो.

---

१ हा अर्थ आपल्या पौर्वात्य शास्त्राधारेंच समजून येईल.

त्या वेळीं त्या मनुष्यास " तूं कोठें होतास ? काय करीत होतास ? " असें विचारतां " मला गाढ झोंप लागली होती, " असें तो बोलतो.

सबब त्याचा प्राण त्याच्या शरीराला सोडून गेलेला नसतो. त्यामुळें केवळ श्वासोच्छ्वास बंद झाला, अथवा हृदयाचा व्यापार बंद पडला असें पाहून तो मनुष्य मृत झाला आहे असें समजून उतावळीनें त्याचें तावडतोब दहन करणें अथवा त्याला मूठमाती देणें हें अत्यंत गैर आहे. **कांहीं तासांची अवधि जरूर दिलीच पाहिजे.** योग्याला भूमिगत करण्यापूर्वी त्याच्या टाळूवर जोरानें आघात करितात, याचें कारण हेंच. इतकेंच नाहीं तर मनुष्याचें मृत शरीर दहन करतांना त्याचा कपाळमोक्ष होईपर्यंत त्याचा प्राण त्याचें शरीर सोडून गेला नाहीं असें समजतात.

शरीरसंगोपनासाठीं हृदय ही त्या प्राण्याची अत्यंत अमोलिक वस्तु आहे. हें हृदय एका क्षणाचा विसावा न घेतां मनुष्याच्या गर्भाच्या पांचव्या महिन्याप्रासून तों त्याच्या देहांतापर्यंत रात्रंदिवस काम करीत असतें. या लहानग्या वस्तूंत काय प्रचंड शक्ति सांठवलेली आहे याचा आपण अतिपरिचयामळें मुळींच विचार करीत नाहीं.

प्राणीशास्त्राचें अध्ययन करणारा विद्यार्थी बेडकांच्या पायांतल्या बोटांमध्यें असणाऱ्या पातळ पडद्यांतून चाललेला रुधिरप्रवाह सूक्ष्मदर्शक यंत्रानें जेव्हां पाहतो तेव्हां त्याला सानंदाश्चर्य वाटतें. हा देखावा प्रत्येकानें जरूर एकदां तरी आपल्या डॉक्टरस्नेह्याकरवीं पाहावा अशी लेखकाची खास नम्र विनंति आहे. हें पाहण्यासाठीं तो बेडूक मारावा लागत नाहीं, हेंही लक्षांत ठेवावें.

याचप्रमाणें Tradescantia Discolor ( ट्राडेस्कान्शिया डिसकलर ) या नांवाच्या एका घायपातासारख्या पण लहान व अत्यंत सुंदर रंगाच्या झाडाच्या सफेत फुलांच्या परागांच्या देठांत चाललेला प्रवाह सूक्ष्मदर्शक यंत्राच्या

---

टीप ३१ यावरून प्रश्न उद्भवतो कीं, मृत्युपूर्वीच्या भयंकर वेदना संपल्यावर, मृत्यु ही प्रत्यक्ष स्थिति झोंपी जाण्याप्रमाणें आनंददायक असावी. —संपादक.

वाड्ग्यानें दिसतो, हा देखावादेखील जरूर पाहावाच पाहावा. त्यामुळें झाडाचें अंगोपंग कसें होत असतें तें स्पष्ट दिसतें.

बेडकाला मारून, त्याचें हृदय त्याच्या शरीरावेगळें करून एका रकाबींत ठेऊन त्याच्यावर एक कांचेची हंडी उपडी ठेवून साधारण उबदार जागेंत ठेवलें असतां, तें स्वतंत्र हृदय, आंत रक्ताचा एकही थेंब नसलेलें साधारण चोवीस तासपर्यंत शरीरांत काम करीत असल्याप्रमाणेंच पिळे देत असतें. हा एक अत्यंत आश्चर्यकारक देखावा आहे.

याविषयीं विद्यार्थ्याला प्रश्न करावा, "हें कसें काय, निराधार असून चालत आहे तें ?" तो ठराविक उत्तर देईल "Oh ! It is owing to its nervous centre." ("त्याच्यांत असलेल्या मध्यवर्ति चालनातंतूमुळें") "अरे, तूं म्हणतोस तीच तर **प्राणाची चावी ना ?** प्रत्युत्तर कसलें ?" कारण सूक्ष्म विचार करण्याची हौस असेल तर !!

बरें, इतक्यानें न थांबतां, त्या मृत बेडकाच्या शरीरांतली सर्व आंतडीं बाहेर काढून, एक Voltaic Battery (रसायनयुक्त हलका विद्युत् प्रवाह उत्पन्न करणारी बॅटरी.) घेऊन, अथवा सध्यां आपणांपाशीं जे (Electric torches) म्हणजे खिशांत ठेवण्याचे अथवा हातांत धरण्याचे विजेचे कंदील असतात; त्यांतील एक लहानशी बॅटरी घेऊन, तिच्या दोन्ही पत्र्यांना दोन विजेच्या दिव्यांच्या तारा लावून, त्यांचें एक टोंक त्या मारलेल्या बेडकाच्या मानेच्या मणक्यांत ठेवावें, आणि दुसऱ्या तारेचें टोंक त्या बेडकाच्या पायाच्या नखांजवळ लावतांच तें मृत शरीर जिवंत असल्याप्रमाणें झटका देऊन दोन्ही पाय झाडतें. हा प्रयोग वारंवार केल्यानें त्या शरीरांतली शक्ति नष्ट होते. हा प्रयोग स्पष्ट दाखवितो कीं जरी शरीर मृत झालेलें दिसतें तरी त्याच्या आंतांत असलेली चेतना सर्वस्वी नष्ट झाली नसते. अशी जर परिस्थिति आहे तर मग श्रीतुकाराममहाराज म्हणतात त्याप्रमाणें

---

१. शरीर मृत झालें असतांही दाढीमिशीचे केंस वाढत असतात. —संपादक.

**अशक्य तें काय तुम्हा नारायणा, निर्जिवा चेतना आणावया।**

या संतवाक्याचा सर्वांनी सूक्ष्म विचार करावा. संत कोणत्या स्थितिप्रत गेले असतात ? जगन्माता त्यांची कशी झाली असते ? अथवा Cosmic Energy (कास्मिक एनर्जी) म्हणजे जगज्जननींचें त्यांना अनुभवयुक्त पूर्ण ज्ञान कसें झालें असतें, याविषयीं विचार करून संतांच्या या केवळ भाकडकथा नाहींत, यांत कांही तरी तथ्य आहे, यांचा सूक्ष्म विचार प्रत्येक आधुनिक विद्वान व विदुषींनीं जरूर करावा.

श्रीसाइमाउलीनें मेलेलें बकरीचें पोर उठविलेलें आम्ही सर्वांनीं पाहिलें, ही अतिशयोक्ति मुळींच नाहीं; आणि याच प्रकारच्या श्रीसाईमाउलींनें वेळोवेळीं दाखविलेल्या तिच्याच **गोड कला** नाहींत काय ?

" मी महालक्ष्मी आहें ! मी खोटें बोलत नसतों " हे शब्द त्यानीं कृतींत उतरवून दाखविले नाहींत काय ?

**" म्हातारा "**

# काय करावें ?

"अहो म्हातारे बुवा, तुम्ही आम्हाला काय करावयाला सांगतां तरी ? आम्हाला या संसारांत सर्व बाजूंनीं त्रास होत आहे, तर बायकामुलें, आईबाप, भाऊबंद, मित्रमैत्रिणी, नोकरचाकर, घरदार वगैरे सोडून देऊन रानावनांत जाऊन 'हरि हरि' करीत बसावें काय ? या निवृत्तिमार्गाच्या शिकवणीनें आमच्या देशाचें अगणित नुकसान झालें आहे. आम्ही कर्तव्यशून्य होऊन काय करावें ? पुढें कसें ? या विचारांनीं हताश व निःसत्व झालों आहोंत. जर वरील प्रकारचा तुमचा उपदेश असेल तर तो तुमच्याजवळच ठेवा ! तुमच्या समजुतीप्रमाणें आम्ही पापी असलों तरी चालेल, पण वायफळ बडबड आम्हाला नको !".

हाच विचार सर्वत्र दिसून येतो, आणि तो पाश्चात्य शिकवणीच्या फोलपणामुळेंच आहे.

"पहिल्यानें शब्द उत्पन्न झाला. त्यानंतर देवानें ही सृष्टि पांच दिवसांत बनविली. सहाव्या दिवशीं मनुष्य निर्माण केला व सातव्या दिवशीं देवानें विसावा घेतला."

ख्रिस्त्यांच्या बायबलांतील या वाक्यांचा खोल अर्थ न समजल्यामुळें[1] आणि प्रचलित आधिभौतिक शास्त्रांच्या शिकवणीमुळें, पाश्चात्य [illegible] सृष्टोत्पत्तीचा वर दर्शविलेला दाखला मूर्खत्वाचा आहे, असे साहजिक वाटून त्यामुळें देव वगैरे सर्व झूट गोष्ट आहे, खावें, प्यावें, मजा करावी, सर्व सृष्टि आमच्या मालकीची आहे, आमच्या उपभोगासाठीं आहे. उत्क्रांतिवादाच्या विचारांनीं तर त्यांच्या पुस्तकी धर्मभावनेला साफ झुगारून दिलें. या सर्व कारणांनीं निवृत्तिरूप विचार त्यांना त्याज्य वाटून सर्व प्रकारच्या प्रवृत्तिपर विचारांचाच पगडा सर्वांच्या ठिकाणीं दिसून येतो.

---

१ हा अर्थ आपल्या पौर्वात्य शास्त्राधारेंच समजून येईल.

या त्यांच्या प्रचलित विचारपद्धतीमुळें आपल्याकडील तरुण, विद्वान मंडळी हुरळून जाऊन त्यांच्यावर पण त्याच विचारांची छाप पडून त्यांचीं मनें डळमळीत झालीं आहेत.

आपल्या जनतेचा ऱ्हास झपाट्यानें झाला असता, परंतु आमच्या दिव्य संतमालिकेच्या जिवंत वचनांच्या ओघानें त्या पडतीला सांवरून धरून बराच थाळा आणिला आहे.

आमच्या आधुनिक विद्वानांचा आरोप असा आहे कीं, तुम्ही मृत्यूनंतरच्या पुढील स्थितीच्या विचारांवर विनाकारण कालक्षेप करून, सध्यांच्या तुमच्या कर्तव्यांना विसरत आहांत.

हा आरोप कांहीं खोटा नाहीं. श्रीमंत मनुष्य धनसंचय करीत असतां गोरगरिबांच्या माना पिळून, त्यांच्यापासून मरमरेतों काम करून घेऊन, अन्न-पाण्याला त्यांना सारखें तळमळत ठेऊन त्यांचे हपाप व शिव्याशापांचें श्रेय संपादन करीत असतां नवीं देवालयें वगैरे बांधून पुढच्या जन्मासाठीं पासपोर्ट घेण्याची तजवीज करीत असतो, हाच प्रकार आपल्या देशांत सर्वसाधारण दिसण्यांत येत आहे.

चालत्याबोलत्या दरिद्रीनारायणाच्या जिवंत देवालयांचे याप्रमाणें हाल होत्त आहेत, त्यांकडे जावें तसें लक्ष जात नाहीं. कुणाचें तसें गेलेलें दिसून आल्यास तें केवळ दांभिक वृत्तीचेंच लोकेषणा मिळविण्याच्या हेतुनें असतें, असें हटकून दिसावयाचें. याला धर्माचरण म्हणतां येईल काय ?

आमच्या संतांची शिकवण याप्रकारची केव्हांही नव्हती. त्यांच्या निवृत्तिपर लेखांवर वरवर विचार होऊन, खोटीं ग्रिधानें बांधण्यांत आलीं आहेत.

श्रीसाईबाबांनीं श्रीमारुती, शनी, खंडोबा वगैरे सर्व जुन्या देवालयांचा जीर्णोद्धार करविला व त्याच वेळीं तडीतापडी वगैरे भुकेल्या नारायणांच्या जिवंत देवालयांसाठीं अन्नसंतर्पण चालू ठेविलें होतें.

श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा सार व भार हाच होता कीं, " तुम्ही आनंदानें संसार करा. मात्र तो चालवितांना प्रभूची आठवण ठेवीत जा. हा संसार माझा नव्हे, देवाचा आहे, ही जागृतावस्थेंतली सतत भावना ठेवा. गोरगरिबांचा परामर्श घ्या, त्यांना छळूं, गांजूं नका. 'आपण कोण' याचा विचार करीत जा !" हीच त्यांची शिकवण दृष्टोत्पत्तीस येत होती व अद्यापिही येत आहे, आणि आमच्यासारख्या गांजलेल्या व संत्रस्त स्त्री-पुरुषांसाठी त्यांनी सर्वस्वी आधारभूत असा आपल्या अलौकिक चरणांचा ठाव कायम ठेविला आहे.

देवदर्शनोत्सुक जनांसाठीं पण त्यांची शिकवण असे कीं, स्वल्प अन्न सेवन करून नंतर देवदर्शनासाठीं जावें.

हें जरा विपरीत दिसेल; कारण पूजाअर्चा झाल्याशिवाय अन्नग्रहण करणें हें चमत्कारिक वाटतें. पण श्रीसाईबाबांच्या शिकवणीच्या भक्तिला उघड दिसतो कीं, या आपल्या कायेच्या अंतर्यामिन्‌ला, तिच्या खऱ्या मालकाला थोडेंबहुत तृप्त केल्याशिवाय तुझ्या कायेच्या इंद्रियांचीं कार्यें सुरळीत न चालून तुझें मन स्वस्थ राहणार नाहीं; आणि मन स्वस्थ नसल्यामुळें ध्यानधारणा तुझ्या हातून न घडून तुझी पूजा निरर्थक होईल.

आम्हांसारख्या इंद्रियनिग्रहविहीन असणाऱ्यांना हेंच सोईवार आहे असें वाटतें. स्वल्प आहार करून नंतर प्रभूचें सेवाअर्चन करावें, अथवा **ठराविक** वेळींच तसें करावें, तरच मन स्वस्थ राहणार आहे. या बाबतींत मतभेद होण्याचा संभव आहे.

श्रीबुद्धदेवाच्या चरित्रांतील एका प्रसंगाची आठवण होत आहे.

या जगांत जेथें पाहावें तेथें दुःख. दुःखानें सर्व जग गांजलेलें, पीडलेलें असें पाहून हृदय पिळवटून, याच्या शमनार्थ उपाय मिळेल काय या तळमळीनें आपलें सुंदर लहान बालक, प्रेमळ पत्नि, सुखसमाधानाच्या चित्रविचित्र साधनांनीं भरलेला अमोलिक वाडा, यांचा त्याग करून श्रीबुद्धदेव एका

१ एडविन आर्नोल्डच्या लाईट आफ एशिया पुस्तकावरून.

कंगालप्रमाणें परिभ्रमण करूं लागले. फिरतां फिरतां अनेक विद्वान शास्त्री, पंडित यांचा समागम झाला. कडाक्याचे वादविवाद झाले; परंतु त्यांच्या मनाचें समाधान न होऊन, या जगांत या दुःखपरिहाराची मार्गा कोठें आहे ती शोधून पाहावी म्हणून ते एका वडाच्या झाडाखालीं तपश्चर्येला बसले.

जगाच्या दुःखनाशार्थ तें राजबिंडें शरीर तहानभूक बाजूला सारून वणवण करीत फिरफिरून जेव्हां त्या पवित्र झाडाखालीं तपश्चर्येसाठीं बसलें, तेव्हां त्याच्यांत कांहीं त्राण राहिला नव्हता. अशा प्रकारें कांहीं दिवस गेल्या-वर तें त्यांचें शरीर फारच थकलें. अशा वेळीं दोन कलावंतिणींच्या पोरी तिकडून जात असतां त्यांची नजर त्या मृतवत् शरीराकडे गेली, आणि त्या आपआपसांत म्हणाल्या, " काय मूर्ख तरी हा मनुष्य आहे, उपासतापासामुळें याच्या शरीरांत आतां कांहींपण शक्ति उरली नाहीं, आणि तपश्चर्या करीत बसला आहे ! ती त्याला साधेल तरी कशी ? "

हे शब्द ऐकतांच श्रीबुद्धदेवांना त्या मुलींच्या त्या उद्गारांच्या सत्यते-विषयीं खातरी पटून आतां पुढें कसें व्हावें हा विचार त्यांच्या मनांत उद्भवला.

ही गोष्ट, श्रीसाईबाबांची आम्हां दीन अज्ञानी संसारी माणसांच्या कल्याणासाठीं वर वर्णन केलेल्या स्थितीशीं जुळते कीं नाहीं याचाही सूक्ष्म विचार व्हावा.

---

१ पुढली हकीकत येणेप्रमाणें:—त्या रात्रीं पहांटेस जवळच्या एका श्रीमान् जमीनदाराच्या बायकोला स्वप्न पडलें कीं, " जवळच्या रानांत एक महान साधु तपश्चर्येला बसला आहे त्याला तूं दूध पाज, तुझें कल्याण होईल ! "

ती तात्कालतोब जागी झाली आणि आपल्या दासीला उठवून, गोठ्यांतल्या उत्तम गाईचें दूध स्वहस्तांनीं काढून, शोध करीत जाऊन, तिनें ते श्रीबुद्धदेवाला पाजलें. त्यामुळें त्यांना हुशारी वाटली. ही सेवा तिनें पुष्कळ काळ केली, आणि त्या आधारावर श्रीबुद्धदेवाला पुढें आत्मसाक्षात्कार झाला.

लेखकाचा मित्र, त्याची बायको, मुलें वगैरे सर्व मंडळी सकाळीं फक्त चहा घेऊन, शिवेच्या ओढयावर स्नानें करून, कपडे धुवून, नंतर श्रीद्वारका-माईत दर्शनासाठीं जात असत. आरती बारांची असल्यामुळें, आणि मुंबईत १०-१०॥ वाजतां जेवणाची संवई असल्यामुळें, आणि कांहींही फराळानें न खाल्ल्यामुळें आरतीच्या वेळी त्यांच्या पोटांत कालवाकालव होत असे. तें जाणून सकाळीं काकडआरतीच्या वेळीं बाबा बोलत, " बापसाव ! आज आरती अकरा वाजतां कर, उशीर लावूं नकोस ! ! " तेव्हां कै. बापूसाहेब जोगांनीं गुणगुणत असावें, " श्रीदत्तमहाराजांची आरती बारा वाजतांची खरी, पण ही मुंबईकर मंडळी आली म्हणजे बाबा वेडे होतात; म्हणे आरती अकरा वाजतां कर ! "

पण आपण कांहींही खाल्ल्याशिवाय उपाशी असून आरतीला आलों आहोंत याची त्यांनीं केव्हांही कुणापाशीं तक्रार न केल्यामुळें, श्रीसाईबाबांच्या " आरती अकरा वाजतां कर ! " या शब्दांचा कै. बापूसाहेबांस उलगडा कसा व्हायचा ?

आपण सर्व गृहस्थाश्रमी असल्याचा डौल घालतों, पण आपणाकडे येणाऱ्या पाहुण्यांच्या अथवा प्राण्यांच्या तहानभुकेचा कांहींतरी विचार करतों का ?

त्याचप्रमाणें जरा दूर नजर फेंकून अन्नपाण्याशिवाय व्याकुळ होऊन तळमळणाऱ्या दरिद्रीनारायणांचा आपल्याला विचार करावयास नको ! आणि हा जर विचार जागृत राहिला नाहीं तर जपतपादि साधनें कधींतरी फलीभूत होऊन आत्मसाक्षात्कार होईल ?

श्रीसाईलीलेंत यासंबंधानें कै. नानासाहेब चांदोरकर व भिकारीण यांचा, श्रीबाबांनीं दिलेला दाखला, पुन्हां पुन्हां वाचून मनांत ठसवावा.

दरिद्रीनारायणांची सेवा हीच स्वदेशसेवा, स्वदेशप्रेम, यांचें इंगित आहे. त्याची जाणीव नसल्यास तें मनुष्य पाषाणहृदयी समजावें. त्यानें केलेले जप, जाप्य, तप, होम, हवनें, कथा, लेक्चरें सर्व वृथा आहेत,

सर्व गृहस्थाश्रमींनी स्वधर्म कसा पाळावा याविषयीं तुकारामहाराज यांचा गोड उपदेश:—

**" प्रथम भाव शुद्ध कर । अंगीं वैराग्याचा भर ।**
**भक्ति पाहिजे शिरजोर । याहुनी धर्म कोणता ॥ १ ॥**
**नका त्यजूं स्त्रिया पोर । बांधीं सोपे माड्या घर ।**
**आल्या अतिथा आदर । याहुनि धर्म कोणता ॥ २ ॥**

या अभंगांत पहिल्या चरणांत दर्शविल्याप्रमाणें परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं श्रद्धायुक्त भावनेनें राहून, हीं मुलें, लेंकरें, त्यांची माता, हें घर, ह्या वाड्या, हीं शेतें, हें शरीरदेखील जीं माझीं व माझ्या मालकीचीं मी चुकीनें समजतों, तीं खरोखरी तुझींच आहेत; त्यांवर सर्वस्वी सत्ता, देवा! तुझीच, ही आपल्या **जागृतअवस्थेंतली दृढ भावना** याचेंच नांव वैराग्य. वैराग्य म्हणजे त्या सर्वांवर रुसूनफुगून, फटकून वागून, स्वैर वर्तन ठेवणें हा गृहस्थाश्रम नव्हे. गृहस्थाश्रमी पुरुषाच्या अशा वर्तणुकीला वैराग्य हें नांव शोभणार नाहीं. 'वैराग्य' शब्दावर अकांडतांडव रचून " नाश केला शब्दज्ञानें " या श्रीतुकोबांच्या उक्तिप्रमाणें गडबड घोटाळा विनाकारण करण्यांत आला आहे.

श्रीतुकाराममहाराज आपल्या स्त्रीबरोबर फटकून वागत असत असा त्यांच्यावर आरोप आहे. यासंबंधानें कै. डॉ. प्रभाकर भांडारकर व लेखक यांचा त्यांच्या विद्यार्थिस्थितींत (१८८१–८४) कडाक्याचा वादविवाद होत असे. डॉ. प्रभाकर यांनीं त्यांच्या प्रेमळ स्वभावाला अनुसरून त्या माउलीचा पक्ष उचलावा, आणि लेखकानें महाराजांचा पक्ष उचलावा. बायकोचें लुगडें त्या भिकारणीला दिलें या गोष्टीमुळें डॉक्टरसाहेबांस फारच संताप येत असे.

लेखकानें "म्हणावें कुणाला ठाऊक, त्या माउलीपेक्षां त्या भिकारणीला त्या लुगड्याची गरज जास्त असावी, अथवा बायकोचा अभिमान जावा म्हणूनही महाराजांनी तसें केलें असेल ! !"

त्या विवादांची आठवण झाली म्हणजे हंसूं येतें ! श्रीतुकाराममहाराजांची योग्यता ती किती, आणि त्यांच्या कृतीवर आक्षेप घेणारांची योग्यता किती ! !

हाच प्रकार आधुनिक विद्वानांच्या आचरणांत व विवेचनांत दिसून येतो. संतांच्या सामर्थ्याचा किंचितूही गंध नसतां केवळ वायफळ बडबड होत असते ! अशा बडबडींतून कांहीं तरी फळनिष्पत्ति ?

सारांश, गृहस्थाश्रम्याचा अधिकार फारच मोठा आहे. त्याला निरनिराळ्या परिस्थितींबरोबर झगडावयाचें असतें. कायिक, वाचिक, मानसिक व आर्थिक स्थितीचें सारखें आंदोलन चाललें असतें. अशा वेळीं ज्या स्थितींत तो असतो त्या स्थितींत त्यानें मीठभाकर खाऊन कां होईना, पण आनंदानें राहण्याचा अभ्यास ठेविला पाहिजे. उदासीनता ती ही.

श्रीजगन्नियंत्या परमेश्वरावर निडर विश्वास ठेवून, मागें सांगितल्याप्रमाणें आपल्या प्रत्येकांत काय अमर्याद सामर्थ्य आहे याची जाणीव संतवाक्यांवर पूर्ण भिस्त ठेवून प्राप्त करून घेतलीच पाहिजे. ही जाणीव उत्पन्न होतांच आपण कोण याचाही तात्काळ उलगडा होतोच. श्रीसाईमाउली हमेशा बोलत असे, "अरे ! आपुन कोण ! याचा विचार रातदिन करावा." हा विचार मनांत घोळत असणारा मनुष्य दारिद्रीनारायणांची सेवा करण्याला लायक होतो. स्वदेशप्रेम, स्वदेशसेवा अशांच्याच हातून गाजावाजारहित पण खऱ्या प्रकारानें होत असते. जनता आपण होऊन अशांच्या पाउलांस पाऊल देते. वरपांगी दांभिक आचरण ठेवणाऱ्या उथळ मनुष्यांच्या हातून कांहींही परिणामकारक व चिरायु कामगिरी कदापि झाली नाहीं व होणार नाहीं.

ज्या श्रीसाईमाउलीचा अधिकार सर्व जगावर चालत असलेला अनेकांनीं पाहून घेतला आहे, त्या संसारी स्त्री-पुरुषादिकांना श्रीसाईमाउलीनें

"**मार्शी सरकारं**" म्हणून संबोधात्रें. यावरून गृहस्थाश्रम्याचा अधिकार किती मोठा आहे याचा सर्वांनीं मनापासून विचार करावा.

म्हणून सर्व आधुनिक विद्वान व विदुषींना नम्र विनंति करण्यांत येत आहे कीं, ईश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवून, आपल्या मुलांलेंकरांना, सुहृदांना, नोकरचाकरांना सारख्या प्रेमानें वागवून, तडीतापडी, अतिथअभ्यागत, दरिद्री या सर्वांत आपल्याप्रमाणेंच ईश्वराचें पूर्ण अस्तित्व आहे असेंच ठाम समजून घेऊन, त्यांची होईल तितकी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सेवा करणें हेंच गृहस्थाश्रम्याचें काम आहे. हें सर्व करतांना "देवा! जें कांहीं माझ्याकडून चुकीनें घडत आहे, त्याची पूर्ण क्षमा करावी," अशी विनम्रभावें आपल्या मनःचक्षूंपुढील इष्ट ध्येयमूर्ती अथवा चिन्ह, अथवा तेजबिंदु यांचें ध्यान करून प्रार्थना करावी कीं क्षणोक्षणीं तुझा **जयजयकार होत आहे, सर्व हृदयांत तुझी आरती झटून होत आहे,** ही जागृत अवस्थेतील भावना मनांत दृढ असावी. हीच प्रत्येक सद्गृहस्थ आणि सुगृहिणी यांची हा भवसागर आनंदानें तरून जाण्याची मुख्य किल्ली आहे, असेंच आपल्या व इतर साक्षात्कारी संतवचनांवरून स्पष्ट दिसून येत आहे.

**म्हातारा.**

# श्री संतकथामृत

## अध्याय ३ रा

श्रीगणेशायनमः ॥ हे ऋद्धिसिद्धीच्या नायका । अज्ञानमूल विध्वंसका । हे अपर्णा बालका । कार्य सिध्यर्थ वंदू तुला ॥ १ ॥ मागिलाध्यायीं निरूपण । गुरु तेगबहद्दर पाटणालागून । राहिले स्वस्थ चित्तें करून । सांप्रदायी नानकाचे ॥ २ ॥ इकडे दिल्लीचें वर्तमान । ऐका तुम्ही श्रोते जन । मत्त झाले यवन । राज्यमदेंकरूनी ॥ ३ ॥ भागीरथी यमुनेंत । लघुशंका करिती नित्य । गोमांस आणून प्रवाहांत । टाकूं लागले ठायीं ठायीं ॥ ४ ॥ या देशींचे जन समस्त । म्हणती आमुचे गुलाम सत्य । आम्हीं जिंकिले तयांप्रत । त्यांचा न पाड आम्हां-पुढें ॥ ५ ॥ या हिंदूंची अवघी जाती । आमुच्या सुखार्थ निश्चितीं । अजा पुत्रासमान स्थिति । आहे यांची सर्वथा ॥ ६ ॥ अलमगिराचा अवघा डोळा । धर्मावरीच होता भला । तेणें हिंदु समूह त्रस्त झाला । शरण गेले ईश्वरासी ॥ ७ ॥ हे सर्वव्यापक रमापती । आतां अंत पाहसी किती । आमुचा धर्म या जगतीं । देवा बुडूं लागला रे ॥ ८ ॥ हा अवरंगजेब महाकाळ । यासी न म्हणावें भूपाळ । किंवा भासे प्रळया-नळ । आम्हां हिंदूंकारणें ॥ ९ राजसत्तेच्या जोरावर । हा अवघ्यांस झाला शेर । याचा करून विचार । धर्म आमुचा रक्षावा ॥ १० ॥ कैक हिंदु यवन झाले । द्रव्य लोभें करून भले । कैक बळेंच बाटविले । अनाथ दुबळे पाहुनी ॥ ११ ॥ त्यांतून कांहीं ब्राह्मण । करण्या गेले अनुष्ठान । काश्मीर देशालागून । अमरनाथा कारणें ॥ १२ ॥ रुद्रानु-

ष्ठानें करून । तुष्टविला उमारमण । तो सच्चिदानंद भगवान । अमरनाथ परमात्मा ॥ १३ तो सर्वचालक भोलानाथ । देता झाला एक लिखित । लिहून त्या द्विजांप्रत । तें ऐका श्रोते हो ॥ १४ ॥

दोहराः—श्रीनानक जगद्गुरु विसाला । अप चाहे संसर कळकाला । तीन गादीपर बैशो जाये । काज तुमारे सारे सोये । धर्महेत धाऱ्यो अवतारा । दयओसिस धर्मपर वार । यहि पत्रका ले तुम जाव हो । वृता अपनी सकळ सुनावो । वो राखेंगे धरम तुम्हारा । तिन बिन अंते न्हय न उबारा । उठो आइार जाय कर करो । हृदय भरवसा गुरुपर धरो ।

ऐसें पत्र द्विजांप्रती । देता झाला उमापती । तें घेऊनियां हातीं । द्विज आले पाटणातें ॥ १५ ॥ ह्या पत्राचा मथितार्थ । हाच होता श्रोते सत्य । कीं तेगबहाद्दर धर्मार्थ । रक्षण तुमच्या करील ॥ १६ ॥ धर्म रक्षण्या कारणें । अवतार धरिला जयानें । त्याकडे तुम्हीं जाणें । आपुलें गाऱ्हाणें सांगावया ॥ १७ ॥ असो पाहून त्या पत्रासी । तेगबहाद्दर मानसीं । आनंदले निश्चयेंसी । धन्य म्हणती जन्म माझा ॥ १८ ॥ धर्मरक्षणा कारण । मी होईन कुर्बाण । धर्म हाच माझा प्राण । मोक्ष मुक्ती वैकुंठ ॥ १९ ॥ ते आलेले द्विजगण । घेतले जवळ ठेवून । तेगबहाद्दर दयाघन । वळेगला तयांवरी ॥ २० ॥ तेगबहाद्दराचा एक छात्र । विसनसिंग राजा रजपूत । त्यासी अलमगीर नृपनाथ । म्हणूं लागला ऐशा रीती ॥ २१ ॥ अहो राजे विसनसिंगजी । ही ऐका गोष्ट माझी । तुम्ही आपणां म्हण-वितां गाजी । त्याचें दावा प्रत्यंतर ॥ २२ ॥ गौडबंगाला जिंकावा । कोणी न राजा मदतीस घ्यावा । हें न होय तरी स्वीकारावा । धर्म आमुचा महंमदी ॥ २३ ॥ किंवा अपजय येतां तेथें । आम्ही बाटवूं तुम्हांतें । नाहीं पेक्षां येथल्या येथें । धर्म आमुचा स्वीकारा ॥ २४ ॥ तें झाली आड विहीर । त्या विसनसिंगास साचार । हिंमत करून

अखेर। जिंकितों म्हणें बंगाला ॥ २५ ॥ निरोप घेऊन शहाचा । निघाला बिसनसिंग साचा। धरिला रस्ता पाटणाचा। दर्शन घ्याया सद्गुरुचें ॥ २६ ॥ सद्गुरुसी करून नमन। दिल्लीचें अवघें वर्तमान। चरणीं केलें निवेदन । मौन धरून बैसला ॥ २७ ॥ तेगबहाद्दर म्हणती त्यासी। वेडया न भ्यावें मानसीं। चाल आपण बंगाल्यासी। जिंकूं एका क्षणांत ॥ २८ ॥ करूनिया धर्मांतर। जे बनतील सरदार। थू त्यांच्या तोंडावर। त्यांचें वदन पाहूं नये ॥ २९ ॥ स्वधर्म शुद्ध संपत्ती। प्रिय प्राणाहून अती। जो मानी निश्चितीं। तोच महात्मा म्हणावा ॥ ३० ॥ पूज्य मान्य जे धर्मग्रंथ। त्यांसी जे म्हणतील प्रक्षिप्त। त्या धर्मघ्नांच्या पक्तींत। बैसवावें निश्चयें ॥ ३१ ॥ धर्मासाठीं गेल्या प्राण। अधोगती न मिळे जाण। धार्मिकासी नारायण। प्राण मानी आपुला ॥ ३२ ॥ ऐसें बोलून निघाले। उभयतां बंगाल्यास आले। ब्रह्मपुत्रा तटा पातले। धोंबडी ग्रामासन्निध ॥ ३३ ॥ बंगाल सावरी विद्यंत। प्रवीण प्रसिद्ध जगतांत। त्यानें बिसनसिंग सैन्यासहित। ब्रह्मपुत्रेंत बुडविला ॥ ३४ ॥ बिसनसिंग तें पाहोनी। हृदय पिटी दों करांनीं। हाय हाय हे चक्रपाणी। केवढा अनर्थ ओढवला ॥ ३५ ॥ या सैनिकांचे घेण्या प्राण। मीच झालों कारण। स्वप्राणाशा धरून। उगीच आलों येथवरी ॥ ३६ ॥ यांच्या हत्या माझ्या शिरीं। बसतील कीं राव-णारी। ब्रह्मपुत्रा आम्हां खरी। काळ झाली नारायणा ॥ ३७ ॥ पाहून राजा चिंतातुर। बोलते झाले तेगबहाद्दर। साह्य आपणा रमावर। धीर सोडीं न वत्सा तूं ॥ ३८ ॥ तुझ्या सैन्याचें संरक्षण। मी येथें करितों जाण। कर्ता करविता नारायण। सर्व सत्ता हरीची ॥ ३९ ॥ आपुल्या सामर्थे करून। नदी धरिली अधर जाण। अगाध साधूचें महिमान। शेषही वर्णू शकेना ॥ ४० ॥ मंडपासम नदी धरिली। वरच्या-

वर त्यांनीं भली । छावणी अवघी रक्षिली । राजा विसनसिंगाची ॥ ४१ ॥ तीन दिवस पर्यंत । रक्षिला ब्रह्मपुत्रेंत । विसनसिंग सैन्यासहित । आश्चर्य झालें सकळांला ॥ ४२ ॥ बंगाली तें पाहूनी । साशंक झाले आपुल्या मनीं । म्हणती यामध्यें कोणी ना कोणी । सिद्ध पुरुष असावा ॥ ४३ ॥ त्यावांचून अघटित । ऐसें न घडे येथ । ज्यासी झगडतां निश्चित । अपेश येईल आपणां ॥ ४४ ॥ जे ठायीं वसती संत । ते ठायीं भगवंत । प्रयोग त्यावरी न चले सत्य । या सावरी निश्चता ॥ ४५ ॥ संतचरण आपुल्या देशीं । लागले ये समयासी । म्हणून अवघे मिळून त्यासी । शरण जाऊं चला हो ॥ ४६ ॥ एवंच अवघा बंगाला । तेग बहादरा शरण आला । विजय बिसनसिंगाला । लाधता झाला ऐशा रिती ॥ ४७ ॥ तें कळलें वर्तमान । अलमगिरा लागून । तेणें सद्गुरूंस पाचारण । केलें असे दिल्लीसी ॥ ४८ ॥ त्या वेळीं कैकांनीं । केली गुरूस विनंवणी । कीं दिल्लीलागोनी । तुम्ही न जावें पुण्यवंता ॥ ४९ ॥ दिल्ली न आतां अकबराची । ती कपटखानी झाली सांची । जाणून बुजून विषाची । घ्यावी न तुह्मीं परीक्षा ॥ ५० ॥ सर्प असतां वारुळांत । कोण सुज्ञ घालील हात । डोळे झांकून पुरांत । कवणें उडी घालावी ॥ ५१ ॥ तें ऐकून तेगबहादर । करिते झाले मधुरोत्तर । मजला बहातो अलमगीर । अवश्य गेलें पाहिजे ॥ ५२ ॥ ना विष्णु पृथिवीपती । ऐसी आहे शास्त्रोक्ति । जे राजाचा द्रोह करिती । त्यांचें न होय कल्याण ॥ ५३ ॥ मानवा पूज्य ईश्वर । त्याचे खालोखाल गुरुवर । तिसरा तो नृपववर । यांची न अवज्ञा करावी ॥ ५४ ॥ ऐसें सांगून अवघ्यांसी । महाराज गेले दिल्लीसी । जाऊनिया दरबारासी । अलमगिरासी भेटले ॥ ५५ ॥ ती सभा तस्करांची । तेथें स्वारी सद्गुरूची । प्रत्यक्ष मूर्ति धर्माची । जेवीं यावी कौरवसभे ॥ ५६ ॥ व

पिंगळ वेलींत । तुळस उगवावी अकस्मात । किंवा कावळ्यांच्या सभेंत । हंस जैसा बैसावा ॥ ५७ ॥ अलमगीर म्हणे सद्गुरूसी । स्वीकार यवन धर्मासी । तेणें मी तुम्हांसी । नावलौकिका चढवीन ॥ ५८ ॥ देईन मोठीशी मनसबदारी । जेणें हत्ती झुलतील द्वारीं । यासाठींच येथवरी । तुम्हांलागीं वाहिलें ॥ ५९ ॥ ऐकून शहाचें भाषण । महाराज झाले मनीं खिन्न । हे कमललोचना रुक्मिणीरमण । कां रे सत्व वेशी वृथा ॥ ६० ॥ मशीं करण्या धर्मांतर । राजाच लावीत साचार । मग दाद कोणासमोर । जाऊन मागूं मायबापा ॥ ६१ ॥ मग धर्मयुक्त मतीही पांचाली । नग्न करण्या येथें आणिली । या शहारूप दुःशासनें भली । रक्षण करींरे पांडुरंगा ॥ ६२ ॥ खालीं घालूनिया मान । सद्गुरु पाहती अधोवदन । कैसा विपरीत येऊन । काळ ठेपला ये वेळीं ॥६३॥ महाराज म्हणती शहासी । तूं बादशाह वैभवराशी । मजसारख्या फकिरासी । राजा व्यर्थ छळूं नको ॥ ६४ ॥ मी न तुझी फितविली रयत । ना घेतला मुलुख सत्य । किंवा तुझा करण्या घात । मी न सिद्ध जाहलों ॥ ६५ ॥ माळ घेऊन हातांत । सदा भजतों जानकीनाथ । त्या मज आणून सभेंत । विटंबना न ऐशी करीं ॥ ६६ ॥ पंचाननानें झुरळापरी । करूं नये कदा स्वारी । ती केलिया जगांतरीं त्याचीच होय विटंबना ॥ ६७ ॥ आम्ही विटलों वैभवासी । विटलों राज्य सुखासी । आम्ही विटलों संपत्तीसी । राजा आम्हांस नाडूं नको ॥ ६८ ॥ तें ऐकून अलमगीर । म्हणे बोलशी कोणासमोर । केलें पाहिजे धर्मांतर । तुजलागीं भिकाऱ्या ॥ ६९ ॥ महाराज म्हणती शहासी । विचार करीं मानसीं । आठव आपल्या पूर्वजासी । अकबरमहात्म्यातें ॥ ७० ॥ ज्यानें न कुणाचा धर्म छळ । केला ज्याची कीर्ति धवल । त्या कीर्तीस काजळ । अलमगिरा लाऊं नको ॥७१॥ राजा न रक्षक धर्माचा । तो अधिपती राष्ट्राचा । म्हणून त्या राष्ट्रीयांचा । धर्म त्यानें पाळावा ॥७२॥ हें तत्व अकबरांनीं । सदा वाहिलें निज मनीं । म्हणून नांव मेळवूनी । तोच गेला जगांतून ॥७३॥ नृपतीचें असावें ऐसें मन । निर्वैर जेवीं जीवन । निरपेक्ष बुद्धीनें ।

प्रजा आपुली पाळावी ॥ ७४ ॥ परी तें न रुचे त्या शहासी । जेवीं रत्न कुक्कुटासी । वा बाजार वसवींसी । पातिव्रत्य धर्म जैसा ॥७५॥ शहा म्हणे सेवकांसी । कैद करा या जोगड्यासी । तच्छिष्यासह तयासी । ठेवा कैदखान्यांत ॥ ७६ ॥ हा धर्मांतर करण्याचें । कबूल जेव्हां करील साचें । त्याच दिवशीं तयाचें । हें बंधन सुटेल ॥ ७७ ॥ जीवनसिंग शिष्यासहित । महाराज टेविले तुरुंगांत । एके दिनीं शिष्याप्रत । समर्थ ऐसें बोलले ॥ ७८ ॥ शिष्या आपण धन्य धन्य । धर्मार्थ झाली कैद जाण । तेणें आपुला नारायण । गौरव करील वैकुंठीं ॥ ७९ ॥ धन्य धन्य हे पद हात । धर्मार्थ बेड्या त्याले सत्य । कडी तोड्यांची किंमत । नाहीं नाहीं यापुढें ॥ ८० ॥ धर्मार्थ पृष्ठी खाते मार । तेणेंच तिचा उद्धार । देह पहुडे बोंदऱ्यावर । तेणें उद्धार तयाचा ॥ ८१ ॥ धर्मार्थ कोंडा खाऊन । जठराग्नि झाला धन्य । आतां राहिला एक प्राण । तोही देऊं धर्मास्तव ॥८२॥ त्यांतून जन्म हाच कैदखाना । हे जीवनसिंग सुजाणा । त्यापुढें या यातना । कांहींच नाहींत वत्सा रे ॥ ८३ ॥ हा अलमगीर एखादे दिवशीं । बळेंच बाटवील मशीं । यवनस्पर्श या देहासी । कधीं न वत्सा व्हावा रे ॥ ८४ ॥ मशीं दाखवीं तरवार । काढून म्यानाबाहेर । तेणें माझें उडेल शिर । सत्य सत्य त्रिवाचा ॥८५॥ यवन हस्तें न मृत्यु यावा । हीच आस माझे जीवा । हा हेतु त्वां पुरवावा । हीच आहे आज्ञा तुशीं ॥ ८६ ॥ दृष्टी काळवेळावरी । देऊन जीवनसिंगें खरी । तलवार दाविली समोरी । आपल्या सद्गुरुरायाला ॥ ८७ ॥ पाहतां ती तलवार । सद्गुरुचें उडालें शिर । धड पडलें धरणीवर । शिर गेलें आनंदपुरा ॥ ८८ ॥ शरीर मतीरामांनीं अग्नीमाजी जाळिलें जाणी । हल्लीं तया ठिकाणीं । आहे मोठें गुरुद्वार ॥ ८९ ॥ मागें ब्रह्मपुत्रा नदी अधर । जेथें धरिली साचार । तेथें झालें गुरुद्वार । धोंबडीशहा नाम ज्याचें ॥९०॥ शिर येऊन आनंदपुरीं । वंश झालें गादीवरी । तें पाहून वद्ध करीं । गुरु गोविंद पुसतसे ॥ ९१ ॥ महाराज मशीं हवाल । सांगा आपुला आज सकळ । जेणें मजसी तळ

मळ। निवेल सद्गुरु तातराया ॥ ९२ ॥ तैं शिर म्हणे हे सुपुत्रा। हे माझ्या प्रिय छात्रा। गुरुगोविंद परम पवित्रा। ऐक माझी गिरा हे॥९३॥ मी धर्मार्थ झालों कुर्बाण। धर्मार्थ म्यां खर्चिले प्राण। उपदेश कराया तुजलागून। येथें आलों राजसा ॥ ९४॥ स्वधर्माचें संरक्षण। करणें मनापासून। गुरु नानकाचें नांव जाण। चालवावें जगामध्यें ॥९५॥ जग अवघें अशाश्वत। त्याच्या न पडें मोहांत। तरीच होशील ज्ञानवंत। अंतीं जाशील वैकुंठा ॥ ९६॥

दोहरा:—धन दारा संपत सगल जिन आपनी करमनि इनमे कछ संगी नही नानक साची जान पतित उधार८५। भज भयहरण हर अनाथको नाथ कहो नानक तहे जानथे। सदा बसत तुम साथ। तन धन संपे सुख दियो आर जहें निके धाम कहो नानक सुनरे मना। समरत काहे ना राम घटमे हरज बसे। संतान करि यो पुकार। कहो नानक तहे भज मना। भवनदी उतरे पार। सुख दुःख जहे परसे नहीं। लोभ मोह अभिमान। कहो नानक सुनबरे मना। सोमूरत भगवान्।

चौपई:—गुरु ग्रंथ को गुरु माने यामे मोमे भेद न जानो चार बेदको है सार राखो थामे विविध प्रकार।

उपदेश करून ऐशा रीतीं। गुरु गोविंद पुत्रामती। अखेर म्हणाले माझी स्थिती। आण पुत्रा मनांत ॥ ९७ ॥ ऐसें बोलून पडलें शिर। निचेष्टित गादीवर। गुरु गोविंद जयजयकार। करिते झाले तेधवां ॥९८॥ शिराचा निधन संस्कार। झाला केलगडावर। तेथें हल्लीं गुरुद्वार। खुण आहे तयाची ॥९९॥ पहा धर्मार्थ ज्यानें खर्चिले प्राण। तो तेगबहादर होय धन्य। त्या सद्गुरु लागून। नमन माझें हें असो ॥ १००॥ स्वस्ति श्रीसंतकथामृत। साधुतेगबहादर चरित। कथन केलें किंचित। सेवा म्हणे दास गणू ॥ १०१॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

॥ इति तृतीयोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय ४ था

श्रीगणेशायनमः ॥ हे कमलोद्भवनंदिनी वरा । एकदंता परशुधरा । सर्वांगसुंदर मयुरेश्वरा । महाउदारा पाव मशीं ॥ १ ॥ मागील्या ध्यायीं झाली कथा । गुरु तेगबहाद्दर ज्ञानगाथा । गुरु गोविंदाशी तत्वतां । सांगूनिया शिव झाले । ॥ २ ॥ निज पित्याच्या मृत्यूनें गुरु गोविंद राहे खिन्न मनें । म्हणे या अलमगिरानें । कां छळा निरर्थक ॥ ३ ॥ असो याचा जाब त्यासी । विचारीन एके दिसीं । त्या दुष्ट अलमगिरासी । जाऊनियां दिल्लींत ॥ ४ ॥ माझा पिता एकटा । गेल म्हणून त्यानें कैद केला ॥ मी प्रथमतः समुदायाला । जमवून तेथें जाईन ॥ ५ ॥ परी मानवी प्रयत्नासी । यश नोहे निश्चयेंसी । साह्य भगवान जयासी । तो अजिक्य जगातें ॥ ६ ॥ कौरवसेना असंख्यात । परं अर्जुन संहारित । साह्य त्याला रुक्मिणीकांत । मग अपेश कोठोनं ॥ ७ ॥ ऐसा विचार करूनी । हवन मांडिलें सद्गुरुंनी । शुचि ब्राह्मण आणवोनी । वेदवेदांग जाणते ॥ ८ ॥ ज्या हवनें करून भक्ता प्रसन्न झाली भद्रकाली । गुरुजीस देती झाली । खंडा कटयार तलवा ॥ ९ ॥ अजिक दिधला आशिर्वाद । बुद्धि ठेवावी अभेद । जेणें तुर कैवल्यपद । लाधेल जाण गोविंदा ॥ १० ॥ सांप्रत इच्छा झगडण्याची तव मनीं झाली साची । खोड तोडून यवनांची । निजधर्म त रक्षावा ॥ ११ ॥ धर्मार्थ जे कां करिती युद्ध । त्यांस राजी गोविंद स्वधर्म रक्षिता आनंद । होतसे परमात्म्याला ॥ १२ ॥ धर्मसंस्थापन हून । धर्मरक्षक अधिक जाण । धर्मरक्षका नारायण । आपुल शिरीं धरितसे ॥ १३ ॥ स्वार्थासाठीं प्राणहानी । करू नये कदा जाणी स्वार्थ तत्पर लागोनी । रौरवाची प्राप्ती होय ॥ १४ ॥ ऐसें बोल

आदिमाया । गुप्त झाली ते ठायां । गुरु गोविंद लागले पायां । आ शक्ति कालिकेच्या ॥१५॥ यज्ञाची सांगता करण्यास । निरोप धाडिला गुजरजीस । माझ्या दोन मुलांस । पाठवून द्यावें ये ठायीं ॥१६॥ बळी त्यांस देऊनियां । तुष्टवीन आदिमाया । कार्कीं परांचे प्राण घ्याया । नाहीं आज्ञा देवीची॥१७॥ तें ऐकून गुजरजी । नातु घेऊन क्षणामाजीं । गेली निघून ह्मणे आजी । पुत्र माझा झाला पिसा ॥ १८ ॥ पोटचे गोळे देऊन । हा कराया पाहे हवन । जळो याचें साधुपण । पोरें आपुलीं वधूं पाहे ॥ १९ ॥ तो अवघा वृत्तांत । कळता झाला सद्गुरुमत । सद्गुरूनीं तेथल्या तेथ । शाप दिला जननीस ॥ २० ॥ त्या मुलांचें रक्षण । केलेंस तूं आज जाण । त्या चौघांचेंही मरण । तूं पहाशील मातोश्री ॥ २१ ॥ नातु नातु करून । तूंही सोडिशील प्राण । क्षणिक सुखा भुलतां जाण । मोक्ष दूर होतसे ॥ २२ ॥ जरी कोणी न कुणाचें । परी पटल भ्रांतीचें । मानवा नाडितें साचें । असत्या सत्य भासवी ॥२३॥ असो जमवूनीया असंख्य छात्र । निघते झाले सद्गुरुनाथ । हें तयांचें अवघें वृत्त । दिल्लीमाजीं समजलें ॥ २४ ॥ मग तो शहा अलमगीर । खाजामर्दूद सरदार । पाठविता झाला गुरुवर । पारिपत्य त्याचें करावया ॥ २५ ॥ सद्गुरुचे सान्निध्यासी । खाजा पोहोंचला निश्चयेंसी । घेऊन असंख्य सैन्यासी । गणना करूं कोठवरी ॥ २६॥ अरब रोहिले पठाण । कडवे युद्धकला निपुण । आपुल्या चौक्या देऊन । ठायींठायीं बैसले ॥ २७ ॥ खजामर्दूद चैनींत । बैसला फिनखापी तंबूत । आरंभिला त्यानें तेथ । सारिपाट रजनां ॥ २८ ॥ तो रात्रीचा प्रसंग । इकडे गुरु गोविंदसींग पहा किती उत्तम योग । आला म्हणती शिष्यांसीं ॥ २९ ॥ याचा उडवितों सारीपाट । तुम्ही लक्ष द्यारे नीट । जरी जाया न तेथें वाट । परि साधितों शरानें ॥३०॥ धनु ओसारी पाऊनेमका । उडविला

श्री गुरुतेगबहाद्दर । नामस्मरण करी निरंतर । प्रपंच काया नश्वर । हे भावना जयाची ॥ १०४ ॥ सदा सप्रेम भजन करी । नारायण राम कृष्ण हरी । काम मोहादि सहा वैरी । कांपती थरथरा ज्यापुढें ॥ १०५ ॥ ऐसा क्रम कित्येक दिन । चालला पाटण शहरीं जाण । पुढें काय घडलें वर्तमान । तें ऐका पुढीलाध्यायीं ॥ १०६ ॥ सत्पुरुषांचीं रम्य चरितें । हरण करिती सर्व दुरितें । म्हणून विनति श्रोत्यांतें । श्रवण करा संतकथा ॥ १०७ ॥ स्वस्तिश्रीसंतकथामृत । तेगबहाद्दर पूर्वचरित । यथामती वर्णिलें येथ । दास गणू हरिकृपें ॥ १०८ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ २ ॥

इति द्वितीयोऽध्यायः समाप्तः ।

## वर्गणीदारांकरितां

१. श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारास वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२. पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३. अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४. लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—श्रीसाईलीला.

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—श्रीसाईलीला.

"दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. पै. श्री दासगणू महाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ दीपिका**

हा **नरेंद्र बुक डेपो दादर**, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ०।१४; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसानंतर ०।१४; **बाळकडूः**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०।८; **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ०।१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १।१० ) **द्राक्षासव** ( अर्धी रत्तल ०।१४
दीड रत्तल २।८ ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलॉग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आयुर्वेदी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २
पुणेंः—श्री साईनाथ आणि कंपनी.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.